# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 11/01/2023 (बुधवार) सकाळ

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत मौजा वायगाव घोटुर्ली मिरा मारोती कॉम्प्लेक्स ता. उमरेड जि. नागपूर येथे दिनांक १०/१/२०२३ चे १३.३० वा ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— आदील बादशाह खान, वय ३४ वर्ष, रा. भाईजी कॉम्पलेक्स उमरेड हे स्वत:चे ट्रान्स्पोर्ट ऑफिसचे कॅबीन मध्ये बसुन असतांना नमुद आरोपी नामे— १) सौरभ अरूण सिंग, वय २३ वर्ष २) आयुष अरूण सिंग, वय १९ वर्ष ३) अंकित रमेश सिंग, वय २६ वर्ष ४) गुड्डु राजेंद्र सिंग, वय ३८ वर्ष, सर्व रा. वायगाव घोटुर्ली ता. उमरेड ५) शतायु किशोर मानेकर, वय २२ वर्ष, रा. प्लाट नं ६, शारदा अपार्टमेंट कोठी रोड महाल नागपूर ईतर १५ ते २० साथीदारांसह फिर्यादीचे कॅबीनचे आत प्रवेश करून आरोपीतांचे वडिलां सोबत फिर्यादीचे जुने ट्रान्स्पोर्टींग बिलाचे कारणा वरून फिर्यादीचे ट्रान्सपोर्टचे कार्यालयात प्रवेश करुन फिर्यादीस हातबुक्याने मारहाण केली व गळयातील सोन्याची चैन ८ तोळा किंमती अंदाजे ४,५०,०००/—रू. तसेच कॅबिन मधील टेबलचे ड्रॉवर मध्ये ठेवलेले नगदी २,५०,०००/—रू. जबरीने हिसकावुन नेले व आरोपीतांनी फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३९५, ४५२, ३२३, ५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजु डोर्लीकर मो. नं. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा कडोली ता. मौदा येथे दिनांक ०९/०१/२०२३ चे २३.०० वा. ते १०/०१/२०२३ चे सकाळी ०५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शैलेन्द्रकुमार हागामीलाल साहु, वय ३८ वर्ष, रा. नागोला, ता. भिनाय जि. अजमेर रा. राज्यस्थान हा गुजरात वरून ओडीसा साठी ट्रक क्र. RJ—४७ GA — ५२९९ ने निघुन मौदा हद्दीत जयस्वाल ढाबा कडोली येथे जेवन करून ट्रक मध्ये झोपला असता सकाळी उठुन पाहीले असता ट्रक मधील ३५० लीटर डिझेल किंमती अंदाजे ३२,२००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक ब. नं. १८२६ देवेंद्र भुरे मो.क्र. ९५८८६७९८१४ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर